ePaper

अयोध्येनंतर मथुरेवर लक्ष केंद्रित; श्रीकृष्ण जन्मभूमीचा मुद्दा भाजपाच्या अजेंड्यावर



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™



पान 3 वरुन...

कार्तिकी वारीपूर्वी इंद्रायणीला प्रदूषणाचा विळखा!

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 17 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

'VSR कंपनीला वाचविण्याचा प्रयत्न'; रोहित पवारांचा गंभीर आरोप

'मफलर मॅन' फडणवीस?

महाईन्यूज । मुंबई

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणावरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. आज (१६ नोव्हेंबर) घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी अपघाताच्या तपासातील कथित त्रुटींवर बोट ठेवत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप केले. यावेळी त्यांनी 'मफलरमॅन' म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोटो दाखविल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.





पवार म्हणाले की, विमान कंपनी व्हीएसआर आणि व्ही. के. सिंग यांना

अजित पवार यांच्या विमान अपघाताला जवळपास साडेनऊ महिने उलटूनही हा अपघात होता की घातपात, याबाबत स्पष्टता का आलेली नाही? अद्याप गुन्हा का दाखल करण्यात आलेला नाही? तपासाची सद्यस्थिती काय आहे? असे सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केले.

रोहित पवार म्हणाले की, "या अपघातातील वाचवणारी व्यक्ती महाराष्ट्रातील मोठी राजकीय व्यक्ती असल्याचे आमचे ठाम मत आहे. या व्यक्तीचा अजित पवार यांच्या विमान अपघाताशी थेट संबंध असल्याचे आम्ही म्हणत नाही. मात्र, संबंधित विमान कंपनी आणि व्ही. के. सिंग यांना वाचविण्यामागे कोण आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोटो दाखवत त्यांच्याकडे अंगुलीनिर्देश केला.

रोहित पवारांनी कोणते प्रश्न उपस्थित केले?

"अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर सांगण्यात आलं की त्या विमानाचा जो 'ब्लॅक बॉक्स' आहे, तो जळला आहे, तो रिकव्हर होऊ शकत नाही. मग त्यानंतर आम्ही पुरावे दिले आणि मग त्यांना ते मान्य करावं लागलं की 'ब्लॅक बॉक्स' व्यवस्थित आहे. आतापर्यंत दुर्दैवाने अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणात एफआयआर दाखल झालेला नाही. आमची मागणी होती की एफआयआर दाखल करा. 'व्हीएसआर'वर किमान तपास पूर्ण होऊपर्यंत बंदी घाला. मात्र, आमचं कोणीही काही ऐकलं नाही", असं रोहित पवार यांनी म्हटलं आहे.

रोहित पवार 'मफ-लरमॅन'बाबत काय म्हणाले?

"या फोटोत असणारी व्यक्ती या अपघातासाठी जबाबदार आहे असं नाही. मात्र, व्हीएसआरला वाचवणारा व्यक्ती आणि व्ही. के. सिंगला वाचवणारा व्यक्ती, ज्याच्या कंपनीच्या विमानाच्या माध्यमातून अजित पवार यांचा अपघात तरी झाला असावा किंवा घातपात तरी झाला असावा. अशा व्यक्तीला वाचवणारा व्यक्ती कोण आहे? तर ज्याला तुम्ही सगळे मफलरमॅन म्हणता. मग तो मफलरमॅन नेमकं कोण?", असं म्हणत रोहित पवार यांनी मफलरमॅन म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा एक फोटो पत्रकार परिषदेत दाखवला आहे.

या संदर्भातील फोटो अनेक दिवसांपासून आपल्याकडे होता. मात्र, या विषयाचे राजकारण करायचे नसल्याने तो यापूर्वी दाखवला नव्हता, असेही रोहित पवार यांनी स्पष्ट केले. अजित पवार यांना न्याय मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी आपल्या अधिकारांचा वापर करावा, अशी अपेक्षा होती. पंतप्रधानांपर्यंत पोहोच, सीआयडी आणि सीबीआय यंत्रणांशी संबंधित अधिकार असतानाही तपासाला गती का मिळत नाही, असा सवाल त्यांनी केला.

अडीच तासांचा खोळंबा, दहा मिनिटांचा सोहळा!

अमित शहांच्या कार्यक्रमात भाषण नाही, संवादही नाही; निमंत्रितांच्या पदरी निराशा

महाईन्यूज । पुणे

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीतील कार्यक्रमासाठी भारत इतिहास संशोधक मंडळाच्या सभागृहात जमलेल्या पुणेकरांना तब्बल अडीच तास प्रतीक्षा करावी लागली. मात्र, सभागृहात दाखल झाल्यानंतर शहा यांनी अवघ्या दहा मिनिटांत कार्यक्रम आटोपला. ऐतिहासिक कागदपत्रांच्या डिजिटायझेशन प्रकल्पाचे बटण दाबून लोकार्पण करण्यात आले. त्यानंतर सत्कार आणि आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. शहा यांचे मनोगत ऐकण्यासाठी उत्सुक असलेल्या उपस्थितांचा मात्र हिरमोड झाला.



भारत इतिहास संशोधक मंडळाच्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या डिजिटायझेशन प्रकल्पाचे लोकार्पण सोमवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुरकुंबी इतिहास उपक्रमाचे नरेंद्र मुरकुंबी, मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत, सचिव पांडुरंग बलकवडे उपस्थित होते. कोषाध्यक्ष नंदकुमार निकम यांनी सूत्रसंचालन केले, तर बलकवडे यांनी आभार मानले.

शहा यांच्या आधीच्या कार्यक्रमांमुळे त्यांना भारत इतिहास संशोधक मंडळात पोहोचण्यास सुमारे अडीच तासांचा विलंब झाला. त्यांच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर सदाशिव पेठ परिसराला छावणीचे स्वरूप आले होते. सभागृहात उपस्थित असलेल्या ज्येष्ठ नागरिकांसह निमंत्रितांना बराच वेळ प्रतीक्षा करावी लागली. अखेर शहा सभागृहात दाखल झाले. मान्यवरांचा सत्कार आणि डिजिटायझेशन प्रकल्पाचे लोकार्पण झाल्यानंतर काही वेळातच त्यांनी कार्यक्रमस्थळ सोडले. त्यामुळे भाषणाची अपेक्षा ठेवून आलेल्या उपस्थितांची निराशा झाली. शहा यांचा ताफा रवाना झाल्यानंतर उपस्थितांनीही घरचा रस्ता धरला.

WWW.BISMARCHIVES.IN या संकेतस्थळावर ऐतिहासिक कागदपत्रे आणि दुर्मीळ वस्तूंची सचित्र माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. मंडळाकडे सुमारे तीन लाख कागदपत्रे असून, त्यांची साडेसहा लाख पृष्ठे डिजिटल स्वरूपात उपलब्ध केली जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात सुमारे दहा हजार कागदपत्रे संकेतस्थळावर उपलब्ध झाली आहेत.

यामध्ये बखरी, मुघल फर्माने, हस्तलिखिते, ताम्रपट, चित्रे, नकाशे, शिल्पे, शस्त्रे, शिलालेख आणि दुर्मीळ ग्रंथांचा समावेश आहे. या प्रकल्पाचे काम चिन्मय भंडारी आणि मिथिलेश कुलकर्णी यांच्या न्यानसा कंपनीने माईंडस्केप हबच्या सहकार्याने केले आहे. मुरकुंबी इतिहास उपक्रम आणि भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर यांचेही या कामासाठी सहकार्य लाभले. या माध्यमातून मराठ्यांचा इतिहास आणि भारतीय वारसा जागतिक स्तरावर पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत यांनी सांगितले.

डिजिटायझेशन प्रकल्पाची वैशिष्ट्ये

मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित दुर्मीळ कागदपत्रे, ऐतिहासिक नोंदी आणि महत्त्वाचे दस्तऐवज जगभरातील अभ्यासकांना सहज उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने भारत इतिहास संशोधक मंडळाने हा डिजिटायझेशन प्रकल्प हाती घेतला आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या उपस्थितीत २०२१ मध्ये या प्रकल्पाचा प्रारंभ करण्यात आला होता. आता पहिल्या टप्प्याचे लोकार्पण झाले असून, ऐतिहासिक ठेवा डिजिटल स्वरूपात जतन करण्याच्या कामाला गती मिळाली आहे. या उपक्रमामुळे इतिहास संशोधक, विद्यार्थी आणि अभ्यासकांना दुर्मीळ संदर्भ साहित्य सहज पाहता व अभ्यासता येणार आहे.

कोरेगाव पार्कमधील वाहतूक कोंडी फुटणार; भूसंपादनाचा मार्ग मोकळा

महाईन्यूज । पुणे

कोरेगाव पार्क परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पुणे महापालिकेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. परिसरातील नॉर्थ मेन रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी खासगी जागांचे सक्तीने भूसंपादन करण्यात येणार आहे. कार्निव्हल चौक ते ताडीगुत्ता चौक या दरम्यानचा रस्ता ३० मीटर रुंद करण्याचे नियोजन असून, यासाठी २१ कोटी ४० लाख रुपये खर्च होणार आहेत. या भूसंपादनाच्या प्रस्तावाला नुकतीच महापालिकेच्या स्थायी समितीने मान्यता दिली आहे.



पुणे शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या यामुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवर सकाळी आणि सायंकाळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. कोरेगाव पार्क परिसरातही अरुंद रस्त्यांमुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. ही समस्या सोडविण्यासाठी महापालिकेने विकास आराखड्यातील नॉर्थ मेन रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम हाती घेतले आहे.

विकास आराखड्यानुसार हा रस्ता ३० मीटर रुंदीचा असणे आवश्यक आहे. मात्र, सध्या प्रत्यक्षात रस्त्याची रुंदी अवघी ११ ते १४ मीटर आहे. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. कार्निव्हल चौक ते ताडीगुत्ता चौक या दरम्यान रस्ता रुंद करण्यासाठी सुमारे तीन हजार ४० चौरस मीटर खासगी जागेची आवश्यकता आहे. ही जागा संपादित केल्यानंतर रस्त्याच्या रुंदीकरणाचा मार्ग मोकळा होणार आहे.

मात्र, यापूर्वी रस्त्याच्या रुंदीकरणासाठी जागा दिलेल्या काही मालकांना अद्याप मोबदला मिळालेला नसल्याचा आरोप आहे. त्यामुळे नव्याने जागा देण्यास संबंधित जागामालकांकडून विरोध केला जात आहे. महापालिका प्रशासनाने वेळोवेळी जागा ताब्यात घेण्याचे प्रयत्न केले; मात्र जागामालकांच्या विरोधामुळे भूसंपादनाची प्रक्रिया रखडली होती.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने संबंधित खासगी जागा सक्तीने संपादित करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवला होता. सक्तीच्या भूसंपादन प्रक्रियेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे आवश्यक रक्कम जमा करावी लागणार आहे. त्यानुसार २१ कोटी ४० लाख रुपयांच्या खर्चाला स्थायी समितीने मान्यता दिली आहे.

स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले म्हणाले की, कोरेगाव पार्क परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नॉर्थ मेन रस्त्याचे रुंदीकरण आवश्यक आहे. त्यामुळे सक्तीचे भूसंपादन करून आवश्यक जागा ताब्यात घेण्यात येणार आहे. यासाठी २१ कोटी ४० लाख रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद केली जाणार आहे.

रस्ते रुंदीकरणासाठी भूसंपादनाचे आव्हान

पुण्यातील वाढती वाहनसंख्या पाहता रस्त्यांचे रुंदीकरण आणि नवीन रस्त्यांची निर्मिती करणे गरजेचे झाले आहे. मात्र, खासगी जागांचे भूसंपादन हा महापालिकेसमोरील मोठा अडथळा ठरत आहे. जागामालकांना टीडीआर किंवा एफएसआयपेक्षा रोख मोबदला हवा असतो. त्यामुळे अनेक प्रकल्प रखडतात. कोरेगाव पार्कमधील भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रस्त्याच्या रुंदीकरणाला प्रत्यक्ष सुरुवात होण्याची अपेक्षा आहे. मात्र, यापूर्वी जागा दिलेल्या मालकांच्या मोबदल्याचा प्रश्नही महापालिकेला मार्गी लावावा लागणार आहे.

कार्तिकी वारीपूर्वी इंद्रायणीला प्रदूषणाचा विळखा!

छठपूजेसाठी सोडलेल्या पाण्यासोबत जलपर्णी आळंदीपर्यंत; वारकऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

कार्तिकी वारी अवघ्या १५ दिवसांवर आलेली असताना, आळंदीतील इंद्रायणी नदीला पुन्हा एकदा प्रदूषणाचा तीव्र विळखा पडला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतून येणारे प्रक्रियारहित सांडपाणी आणि वाहून आलेली जलपर्णीमुळे नदीपात्र आणखी प्रदूषित झाले आहे. त्यामुळे वारकऱ्यांच्या आरोग्याचा आणि श्रद्धेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



छठपूजेसाठी आंद्रा धरणातून १०० क्युसेकने पाणी सोडण्यात आले होते. त्यामुळे पिंपरी-चिंचवड हद्दीतील जलपर्णी तसेच चिंबळी, केळगाव भागातील जलपर्णी धरणातील पाण्यासोबत खाली वाहून आली आहे.

- माधव खांडेकर, मुख्याधिकारी, आळंदी नगर परिषद.

येत्या १ डिसेंबरपासून संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आळंदीत कार्तिकी यात्रेस प्रारंभ होत आहे. यासाठी राज्यातून लाखो भाविक आणि मानाच्या दिंड्या आळंदीत दाखल होतील. भाविकांच्या सोयी-सुविधांसाठी नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली असली, तरी नदीची सद्यःस्थिती प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे.

चिखली, कुदळवाडी भागातून आलेल्या सांडपाण्याबरोबरच रविवारी (ता. १५) सकाळपासून तुटलेली जलपर्णीही वाहून आली. काळपट, पिवळसर आणि फेसाळयुक्त पाण्यामुळे नदीच्या पावित्र्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. कोट्यवधी रुपयांच्या इंद्रायणी नदी सुधार योजनेच्या घोषणा होत असताना, पिंपरी-चिंचवड प्रशासन आणि राजकीय नेते याकडे केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचे चित्र आहे. कुदळवाडी आणि चिखली भागातून येणारे सांडपाणी तातडीने थांबवले नाही, तर कार्तिकी वारीत लाखो वारकऱ्यांना याच प्रदूषित पाण्यात तीर्थस्नान करावे लागण्याची भीती आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका महापौर रवी लांडगे यांच्याशी यापूर्वीही चर्चा झाली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व आळंदी नगर परिषदेने वेळोवेळी प्रदूषणाबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. वारी काळात वारकऱ्यांना शुद्ध पाण्यासाठी आंध्रा तसेच वडिवळे धरणातून पाणी सोडण्याबाबत जिल्हाधिकारी यांना कळविले आहे.

- प्रशांत कुऱ्हाडे, नगराध्यक्ष, आळंदी नगर परिषद.

हिंजवडी मेट्रोच्या सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी आमदार शंकर जगताप यांचा पुढाकार

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो मार्गावर (वाकड चौक ते माण फेज ३) सोमवारी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी प्रवास केला . यावेळी त्यांनी प्रवासी, आयटी क्षेत्रातील कर्मचारी आणि नागरिकांशी संवाद साधण्यात आला. प्रवाशांच्या अडचणी, अपेक्षा आणि विविध मागण्या जाणून घेतल्या. तसेच वाकड मेट्रो स्टेशन परिसरातील कामाची पाहणी करून या मेट्रो मार्गाचा अधिकाधिक नागरिकांना लाभ मिळावा, प्रवास सुलभ व्हावा आणि शहरातील वाहतूक कोंडी कमी व्हावी, यासंदर्भात नियोजन करावे अशा सूचना यावेळी मेट्रो तसेच पिंपरी चिंचवड महापालिका अधिकाऱ्यांना केल्या आहेत.



हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो ही केवळ आयटीयन्ससाठीच नव्हे, तर पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाची सार्वजनिक वाहतूक सुविधा आहे. या मेट्रोचा अधिकाधिक नागरिकांना लाभ मिळण्यासाठी स्थानकांपर्यंत पोहोचण्याची सुविधा, फीडर बस सेवा, पुरेशी पार्किंग व्यवस्था आणि इतर सार्वजनिक वाहतूक सेवांशी समन्वय असणे गरजेचे आहे. वाकड मेट्रो स्थानक हे प्रमुख वाहतूक केंद्र म्हणून विकसित झाल्यास पिंपरी-चिंचवडमधील अनेक भागांची कनेक्टिव्हिटी अधिक सुलभ होईल. यामुळे खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होऊन वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासही मदत होईल. यासाठी नागरिकांनी मांडलेल्या सूचनांबाबत संबंधित यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे.

- शंकर जगताप, आमदार चिंचवड विधानसभा.

चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी सोमवारी (दि. १६) हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो मार्गावर (वाकड चौक ते माण फेज ३) प्रवास केला. यावेळी नागरिकांसह पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड (PITCMRL), पीएमपीएमएल, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या वतीने विविध मागण्या मांडण्यात आल्या.

यावेळी आमदार जगताप म्हणाले, हिंजवडी मेट्रो हा खऱ्या अर्थाने 'आयटीयन्स'साठी मोठा दिलासा आहे. मोठ्या संख्येने आयटीयन्स या मेट्रोचा उपयोग करत आहेत. शिवाय शहरातील इतर कनेक्टिव्हिटीला या मेट्रोमुळे मोठा दिलासा मिळणार आहे. या मेट्रो सुविधेमुळे पुनावळे, ताथवडे, वाकड, मामुर्डी,किवळे, रावेत या भागात देखील वाहतुकीवरील ताण कमी होणार आहे.

आमदार शंकर जगताप म्हणाले, हिंजवडी शिवाजीनगर मेट्रो मार्गदर्शन असलेल्या स्थानकांजवळ बहुमजली स्वयंचलित पार्किंग व्यवस्था उभारणे, स्थानकांपासून सुमारे १० किलोमीटर परिसरात नियमित फीडर बस सेवा सुरू करणे, तसेच वाकड मेट्रो स्थानकाचे प्रमुख वाहतूक केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील . वाकड स्थानकाला पिंपरी, चिंचवड, पिंपळे सौदागर, सांगवी, निगडी, रावेत आणि आळंदी परिसरातील बससेवेशी जोडण्याची सूचनाही करण्यात आली. याशिवाय मेट्रो स्थानकांना निवासी व व्यावसायिक भागांशी जोडणारे सौरऊर्जायुक्त संरक्षित स्कायवॉक उभारणे, बस व मेट्रोचे मार्ग, वेळापत्रक, थेट लोकेशन आणि प्रवासखर्चाची माहिती देणारे एकात्मिक प्रवास नियोजन ॲप विकसित करणे, तसेच मेट्रो आणि फीडर बससाठी एकत्रित तिकीट व सवलतीचे पास उपलब्ध करून देणे. प्रवाशांच्या समस्या आणि सूचनांचा नियमित आढावा घेण्यासाठी मेट्रो-प्रवासी समन्वय समिती स्थापन करणे, तसेच पादचारी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग प्रवासी आणि सायकलस्वारांसाठी स्थानक परिसर अधिक सुरक्षित व सुलभ करण्यावर भर द्यावा अशी सूचना केलेली आहे. या सर्व सूचनांचा आणि मागण्यांचा संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा करून मेट्रो सेवा अधिक प्रभावी, प्रवासीस्नेही आणि सर्वसमावेशक करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

भूमिका

धर्म, अस्मितेच्या राजकारणात जनतेचे प्रश्न हरवले!

मुंबईच्या जुहू चौपाटीवर १९५० च्या दशकात काही मोजक्या बिहारी कुटुंबांकडून साधेपणाने सुरू झालेली छठपूजा आज मोठ्या सार्वजनिक उत्सवाचे स्वरूप धारण करू लागली आहे. काळानुसार उत्तर भारतीयांची संख्या वाढली, सामाजिक संघटना पुढे आल्या आणि धार्मिक उत्सवाला राजकीय पाठबळ मिळू लागले.

१९९८ मध्ये तत्कालीन खासदार संजय निरुपम यांनी शिवसेना आणि बिहारी फ्रंटच्या माध्यमातून सार्वजनिक छठपूजेचे आयोजन केले. त्यावेळी शिवसेना-भाजप युतीचे सरकार होते. त्यामुळे आज ज्या उत्सवावरून राजकीय संघर्ष सुरू आहे, त्याला एकेकाळी शिवसेनेचेही समर्थन होते, हे विसरता कामा नये.

२००६ मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना झाल्यानंतर छठपूजेच्या राजकारणाला वेगळे वळण मिळाले. राज ठाकरे यांनी या उत्सवाच्या माध्यमातून होणाऱ्या राजकीय शक्तिप्रदर्शनावर आक्षेप घेतला. त्यातून उत्तर भारतीय आणि मराठी माणूस असा संघर्ष उभा राहिला. पुढे बिहारच्या निवडणुका असोत किंवा सुशांतसिंह राजपूतच्या मृत्यूचा मुद्दा, प्रत्येक वेळी राजकीय फायद्यासाठी भावनिक विषयांचा वापर झाल्याचे दिसून आले.



आता उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा छठपूजेचा मुद्दा चर्चेत आला आहे. भाजप धार्मिक स्वातंत्र्याचा मुद्दा मांडत आहे, तर ठाकरे बंधू या उत्सवाच्या राजकीय वापरावर प्रश्न उपस्थित करीत आहेत. मात्र, या दोन्ही बाजूंच्या संघर्षात जनतेचे प्रश्न कुठे हरवले आहेत, याचा विचार होणे आवश्यक आहे.

प्रत्येकाला आपला धर्म, श्रद्धा आणि परंपरा जपण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही धार्मिक उत्सवाचा वापर मतांचे राजकारण करण्यासाठी होऊ नये, ही अपेक्षाही चुकीची नाही. धार्मिक स्वातंत्र्य आणि राजकीय स्वार्थ यांची सरमिसळ झाली की समाजात अनावश्यक तेढ निर्माण होते. मराठी विरुद्ध उत्तर भारतीय, हिंदू विरुद्ध अन्य धर्मीय अशा चर्चा रंगतात; पण शहरातील पाणी, रस्ते, आरोग्य, वाहतूक आणि रोजगाराचे प्रश्न मात्र मागे पडतात.

मुंबईसारख्या महानगरात आजही रस्त्यांची दुरवस्था, फुटपाथवरील अतिक्रमणे आणि सार्वजनिक सुविधांचा अभाव कायम आहे. केईएम रुग्णालयात लिफ्ट बंद असल्यामुळे प्लास्टर केलेल्या पायाने रुग्णाला पायऱ्या उतराव्या लागण्याची वेळ येते, ही व्यवस्थेची शोकांतिका आहे. मुंबईचे शांघाय करण्याच्या घोषणा झाल्या; मात्र मूलभूत सुविधांची स्थिती बदललेली नाही. दुसरीकडे, रायगडमधील साईडोंगर परिसरातील वृक्षतोडीचा प्रश्न असो किंवा पर्यावरणाच्या संवर्धनाचा विषय, अशा महत्त्वाच्या मुद्द्यांवरील चर्चा काही दिवसांतच मागे पडते.

राजकारणात आरोप-प्रत्यारोप होणारच; मात्र त्याला काही मर्यादा असायला हव्यात. छठपूजा होणार की नाही, एखाद्या अभिनेत्रीची भूमिका योग्य की अयोग्य, राष्ट्रवादीचे विलीनीकरण होणार की नाही, एखादा नेता नाराज आहे की नाही, अशा विषयांवर माध्यमे आणि राजकीय पक्षांची शक्ती खर्च होते. जनतेच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांवर मात्र ठोस चर्चा होताना दिसत नाही. लोकांनी मूलभूत प्रश्न विचारू नयेत आणि भावनिक मुद्द्यांमध्येच गुंतून राहावे, ही राजकारणाची सोयीची रणनीती ठरू लागली आहे.

लोकशाहीत धर्म आणि संस्कृतीला स्थान आहे; पण विकास, प्रशासनाची जबाबदारी आणि नागरिकांचे हित यांना त्याहून अधिक महत्त्व असायला हवे. राजकीय पक्षांनी मतांसाठी समाजात फूट पाडण्याऐवजी मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी स्पर्धा करावी. अन्यथा मुंबईच्या किनाऱ्यावर उत्सव, अस्मिता आणि राजकारणाची गर्दी वाढत राहील; पण सामान्य माणसाच्या आयुष्यातील समस्यांचा अंधार कायम राहील. शेवटी जनतेला राजकीय शक्तिप्रदर्शन नको, तर सुरक्षित रस्ते, सक्षम आरोग्यव्यवस्था आणि दर्जेदार नागरी सुविधा हव्या आहेत.

प्रासंगिक »

थेंबांचे मोल

एका गावात दोन शेतकरी राहत होते. दोघांच्याही शेतात विहिरी होत्या. पहिला शेतकरी पाण्याचा वापर जपून करायचा. ठिबक सिंचनाने शेती करायचा आणि पावसाचे पाणी शेततळ्यात साठवायचा.

दुसरा मात्र पाण्याची मुबलक उपलब्धता असल्याच्या समजुतीने पाण्याचा अमाप वापर करायचा. काही वर्षांनी गावात दुष्काळ पडला. पावसाने पाठ फिरवली आणि विहिरींची पाणीपातळी खालावली.

दुसऱ्या शेतकऱ्याची विहीर पूर्ण कोरडी पडली. त्याची पिकेही वाळू लागली. मात्र, पहिल्या शेतकऱ्याने पावसाचे पाणी साठवले होते. त्याच्या शेततळ्यातील पाण्यामुळे त्याची पिके वाचली.

हे पाहून दुसऱ्या शेतकऱ्याने त्याला विचारले, "तुझ्याकडे एवढे पाणी कसे टिकले?" पहिला शेतकरी म्हणाला, "मी पावसाची वाट पाहत बसलो नाही, तर प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखून त्याचे नियोजन केले." त्या दिवसापासून दुसऱ्या शेतकऱ्याने-ही पाण्याचा काटकसरीने वापर सुरू केला.

- तात्पर्य : **पाण्याची खरी श्रीमंती मुबलक साठ्यात नसते, तर प्रत्येक थेंब जपण्याच्या सवयीत असते.**

अल निनोचा प्रभाव, अनियमित पाऊस आणि वाढते तापमान यामुळे देशासमोर पुन्हा एकदा जलसंकटाचे आव्हान उभे राहिले आहे. यंदा मान्सूनमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने रब्बी हंगामातील सिंचनासाठी भूजलावरील अवलंबित्व वाढण्याची शक्यता आहे.

भूजल पुनर्भरणासाठी तंत्रज्ञान पुरेसे नाही; लोकसहभागही हवा!

आधीच भूजलाचा अतिउपसा सुरू असताना पाण्याचे नियोजन आणि संवर्धन हा केवळ पर्याय न राहता अनिवार्य गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने भूजल पुनर्भरणासाठी मोबाईल ॲप्लिकेशन आणि वेब पोर्टल सुरू करणे हे स्वागतार्ह पाऊल आहे.



या डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पाऊस, भूजल पातळी, जमिनीची जलधारण क्षमता, जमिनीचा उतार आणि पाण्याचा निचरा यांसारख्या माहितीच्या आधारे पुनर्भरणासाठी योग्य ठिकाणे शोधता येणार आहेत. स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार कोणत्या प्रकारच्या पुनर्भरण रचना उभाराव्यात, याचे मार्गदर्शनही मिळणार आहे. त्यामुळे सरकारी निधीचा विनियोग अधिक नियोजनबद्ध पद्धतीने करता येईल. मात्र, तंत्रज्ञान उपलब्ध झाले म्हणजे भूजल संकट संपले, असे समजणे चुकीचे ठरेल.

केंद्रीय भूजल मंडळाच्या २०२५ च्या मूल्यांकनानुसार, देशातील भूजलाचा वार्षिक उपसा २४७.२२ अब्ज घनमीटरवर पोहोचला आहे. उपलब्ध भूजल संसाधनांच्या तुलनेत हा उपसा ६०.६३ टक्के आहे. देशातील ७३० घटक अतिशोषित श्रेणीत आहेत. विशेष म्हणजे, एकूण भूजल वापरापैकी तब्बल ८७ टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते. त्यामुळे भूजल पुनर्भरणाबरोबरच शेतीतील पाण्याचा वापर नियंत्रित करणे अत्यंत आवश्यक आहे.

यासाठी ठिबक आणि तुषार सिंचनाचा विस्तार, कमी पाणी लागणाऱ्या पिकांना प्रोत्साहन आणि पीक पद्धतीत बदल करणे गरजेचे आहे. मात्र, शेतकऱ्यांना केवळ पीक बदलण्याचे आवाहन करून उपयोग नाही. कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांना हमीभावाने खरेदीची हमी, पीक विम्याचे संरक्षण आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली पाहिजे. अन्यथा आर्थिक जोखीम लक्षात घेता शेतकरी पारंपरिक पिकांपासून दूर जाणार नाहीत.

भूजल पुनर्भरणासाठी गावपातळीवर स्वतंत्र जलव्यवस्थापन आराखडे तयार करणेही आवश्यक आहे. विहिरी, तलाव, बंधारे आणि पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि जलसाठ्यांची नियमित देखभाल याला प्राधान्य द्यावे लागेल. ग्रामपंचायती, सहकारी संस्था आणि जलव्यवस्थापन समित्यांनी यामध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. भूजलाचा अनिर्बंध उपसा करणाऱ्या उद्योगांवरही कठोर नियंत्रण आवश्यक आहे.

शेवटी, भूजल ही अमर्याद संपत्ती नाही, तर पुढील पिढ्यांसाठी जपून ठेवण्याची नैसर्गिक संपत्ती आहे. त्यामुळे केवळ ॲप, पोर्टल आणि सरकारी योजनांवर विसंबून चालणार नाही. तंत्रज्ञानाला प्रशासकीय इच्छाशक्ती, शेतकऱ्यांचे सहकार्य आणि लोकसहभागाची जोड द्यावी लागेल. पाणी जमिनीत मुरविण्याबरोबरच त्याचा काटकसरीने वापर करण्याची मानसिकता निर्माण झाली, तरच भूजल पुनर्भरणाचे प्रयत्न खऱ्या अर्थाने यशस्वी होतील.

।। अभंगवाणी ।।



बाळ बापा म्हणे काका ।
तरी तो कां निपराध ॥१॥

जैसा तैसा भाव गोड ।
पुरवी कोड विठ्ठल ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

सिंधुदुर्ग ते मुंबई विमानसेवा पुन्हा सुरू!

चिपी विमानतळावर उत्साहात स्वागत; भविष्यात सेवा अखंड राहणार; पालकमंत्री नितेश राणे

महाईन्यूज । सावंतवाडी

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला नवी दिशा देणारी आणि दळणवळणाची अत्यंत महत्त्वाची असलेली सिंधुदुर्ग- नवी मुंबई विमानसेवा दोन वर्षांच्या प्रदीर्घ खंडानंतर आज पुन्हा सुरू झाली आहे. चिपी येथील सिंधुदुर्ग विमानतळावर फ्लाय ९१ कंपनीच्या या विमानसेवेच्या शुभारंभप्रसंगी नवी मुंबईहून आलेल्या प्रवाशांचे ढोल-ताशांच्या गजरात, पुष्प व मिठाई देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले.



पालकमंत्री तथा मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी केक कापून आनंदोत्सव साजरा केला आणि मुंबईकडे जाणाऱ्या पहिल्या प्रवाशाला बोर्डिंग पासचे वितरण केले. यावेळी बोलताना पालकमंत्री नितेश राणे यांनी, "सुरू झालेली ही विमानसेवा भविष्यात कधीही बंद पडणार नाही," अशी ठाम ग्वाही दिली.

माजी मुख्यमंत्री तथा खासदार नारायण राणे यांचे सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटनाच्या नकाशावर उज्ज्वल करण्याचे आणि तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे स्वप्न होते, असे सांगत पालकमंत्र्यांनी या विमानसेवेसाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची माहिती दिली. तसेच, राज्य शासनाच्या विशेष प्रयत्नांमुळे आणि आर्थिक पाठबळांमुळे ही सेवा सुरू करणे शक्य झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या शुभारंभ सोहळ्याला माजी मंत्री तथा आमदार दीपक केसरकर, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत, आमदार नीलेश राणे, जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, पोलीस अधीक्षक डॉ. मोहन दहिकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अपूर्वा बासूर, जिल्हा बँकेचे अध्यक्ष मनीष दळवी, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दादा साईल, प्रभाकर सावंत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आमदार दीपक केसरकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, कोकणाची मुख्य जोडणी असणारी मुंबई विमानसेवा पुन्हा सुरू होणे अत्यंत गरजेचे होते. ही सेवा केंद्र सरकारच्या 'उडान' योजनेअंतर्गत सुरू होत असून, यात विमान तिकिटाच्या दरामध्ये शासनाकडून सुमारे तीन हजार रुपयांचे अनुदान दिले जात असल्याने सर्वसामान्य नागरिकांनाही या विमानप्रवासाचा लाभ घेता येणार आहे.

रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार

या विमानतळामुळे केवळ प्रवासाची सुविधा मिळणार नसून जिल्ह्यात पर्यटन, टुरिस्ट गाड्या व इतर व्यावसायिक क्षेत्रात रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध होतील. बाहेरील व्यावसायिकांपेक्षा जिल्ह्यातील स्थानिक तरुण-तरुणींना या संधींचा लाभ मिळवून देण्याचा आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याला विकासाच्या बाबतीत अग्रेसर ठेवण्याचा निर्धार यावेळी नेत्यांनी व्यक्त केला. आमदार निलेश राणे यांनी या सेवेचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन करतानाच पालकमंत्री नितेश राणे यांच्या बद्दल अभिमान वाटतो असे म्हटले आहे.

"अजितदादांच्या अपघाताबाबत स्पष्टता यावी, अहवाल लवकर यावा"; फडणवीसांची मागणी

महाईन्यूज । पुणे

अजित पवारांच्या अपघातासंदर्भातला अहवाल लवकर समोर आला पाहिजे. लवकर अहवाल यावा यासाठी मी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना देखील विनंती केली. अजितदादांच्या अपघाताबाबत स्पष्टता यावी. कोणी दोषी आढळल्यास कठोर कारवाई करणार, असं मोठं विधान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या समोर मुख्यमंत्री फडणवीसांनी ही मागणी केली आहे. अजित पवार यांचा अपघात २८ जानेवारी २०२६ रोजी झाला. महाराष्ट्रावर या घटनेमुळे शोककळा पसरली.



पुणे जिल्हा परिषद परिसरातील यशवंतराव चव्हाण भवन या ठिकाणी राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अर्धपुतळ्याचं अनावरण केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते करण्यात आलं. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, एकनाथ शिंदे यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारसह अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला, यावेळी सगळेच भावूक झाले.

अजितदादा आपल्यातून निघून गेले. त्यांच्या पुतळ्याच्या अनावरणाच्यावेळी आपल्या सर्वांच्या मनात आठवणींचं काहूर आहे. अजितदादांचं पुण्यावर किती प्रेम होतं हे सर्वांना ज्ञात आहे. महाराष्ट्रात दादांचं नेतृत्त्व होतंच, पण पुण्याबद्दल त्यांना विशेष संवेदना होत्या. अजितदादा एक कणखर, शिस्तबद्ध आणि दूरदृष्टी असलेला नेता अशा विविध विशेषणं त्यांना देता येतील. दादांनी अनेक अर्थसंकल्प मांडले पण आर्थिक शिस्त कधी मोडू दिली नाही. वेगवेगळ्या कामात पैसा लावताना त्याची गुणवत्ता, क्वालिटी असली पाहिजे याकडे दादांचा आग्रह असायचा. कुठलीही गोष्ट थेट बोलणं राजकारणात कमी पहायला मिळते. राजकारणात कुणाला थेट बोलता येत नाही. दादांकडे हो आणि नाही असे दोनच शब्द होते. जे पटलं त्याला हो म्हणणार आणि मगं ते काम करुन घेण्यासाठी त्याच्या पाठीमागे उभं राहणार. पण जे नाही पटलं ते नाही म्हणणार. असं सांगण्याची हिंमत असलेले अजितदादा एकमेव होते, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

अजितदादा सकाळी ६ वाजता तयार असायचे, ७ वाजल्यापासून त्यांचं कामकाज सुरू व्हायचं. दादा सकाळी ६ पासून काम करणारे, त्यानंतर मी काम करणारा आणि शिंदेसाहेब रात्री उशिरापर्यंत काम करणारे त्यामुळे अधिकाऱ्यांचं काय होईल हे आम्ही गंमतीने म्हणायाचो. महाराष्ट्रात अनेक प्रकल्प असे दाखवता येतील ज्यावर अजित पवार यांचा शिक्का आहे. अतिशय कणखर वाटणारे दादा उत्कट प्रेमही करायचे. जवळच्या माणसाच्या पाठिशी उभं राहण्यासाठी ते सगळ्या परिस्थितीला तोंड द्यायचं. आज दादा असते तर दुष्काळाशी सामोरं जाण्यासाठी मातीतला गडी मैदानात उतरला असता, असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. दादांच्या जाण्याच्या चटका आपल्याला लागलाच. पण दादांच्या जाण्यानंतर काही प्रश्न लोकांच्या मनात निर्माण झाले आहेत. सामान्यातल्या सामान्य माणसाला प्रश्न पडले आहेत. खरी माहिती समोर यावी अशी बाब राज्यात चर्चिली जाते. मी आज माननीय गृहमंत्री अमित शाह यांना मी विनंती केली की या प्रकरणाचा अहवाल हा लवकरात लवकर यावा. राज्यातल्या प्रत्येकाच्या मनातला संभ्रम हा दूर झाला पाहिजे. या प्रकरणी जर कुणी दोषी असेल तर आम्हाला त्याला फासावर लटकवता आलं पाहिजे. हा जर अपघात असेल तर सामान्य माणसाच्या मनातला आक्रोश आहे त्यावर फुंकर पडली पाहिजे. अमित भाईंनी मान्य केलं आहे की लवकरात लवकर चौकशी अहवाल येईल. मी त्यासाठी त्यांचे आभार मानतो असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

ग्रंथांप्रति काहीतरी आदर बाळगा!

केंद्रीय सचिवालय ग्रंथालय स्थलांतरावरून सर्वोच्च न्यायालयाचे केंद्राला खडे बोल

महाईन्यूज । नवी दिल्ली

दिल्लीतील १३५ वर्षे जुन्या केंद्रीय सचिवालय ग्रंथालयाच्या स्थलांतराच्या मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्र सरकारला फटकारले. या ग्रंथालयात ८.५ लाखांहून अधिक पुस्तकांचा संग्रह आहे. नव्या सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पांतर्गत शास्त्री भवन पाडण्यात येणार असल्याने ग्रंथालय अन्य ठिकाणी हलविण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, पुस्तकांसाठी योग्य पर्यायी जागेची व्यवस्था करण्यात आलेली नसल्याबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली.



"पुस्तकांचा आदर करायला शिका," अशा शब्दांत न्यायालयाने केंद्र सरकारला सुनावले. "तुम्हाला या पुस्तकांची गरज नसेल, तर त्यांची काळजी घेणाऱ्या दुसऱ्या देशाला ती द्या," अशी टिप्पणीही सर्वोच्च न्यायालयाने केली. तसेच, पुढील सुनावणी होईपर्यंत पुस्तकांचे स्थलांतर करू नये, असे निर्देश न्यायालयाने केंद्राला दिले.

केंद्रीय सचिवालय ग्रंथालय सध्या दिल्लीतील शास्त्री भवनमध्ये आहे. सेंट्रल व्हिस्टा पुनर्विकास प्रकल्पांतर्गत या इमारतीच्या पाडकामाचे नियोजन आहे. त्यामुळे ग्रंथालयाचे स्थलांतर करावे लागणार आहे. मात्र, नव्या आराखड्यात ग्रंथालयासाठी योग्य जागा निश्चित करण्यात आलेली नसल्याचे वृत्त समोर आल्यानंतर पुस्तकांच्या भविष्याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने ४ ऑक्टोबर रोजी स्वतःहून (स्युओ मोटो) याचिका दाखल करून घेतली होती. १३५ वर्षांचा इतिहास असलेल्या या ग्रंथालयातील लाखो पुस्तकांचे योग्य प्रकारे जतन व्हावे, हा या हस्तक्षेपामागील मुख्य मुद्दा आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून घेतली दखल

'इन रे : १३५ वर्षे जुने ग्रंथालय, ८.५ लाख पुस्तके आणि नव्या सेंट्रल व्हिस्टा आराखड्यात जागाच नाही' अशा शीर्षकाने या प्रकरणाची नोंद करण्यात आली आहे. न्यायमूर्ती संजय कुमार व न्यायमूर्ती संजीव सचदेवा यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी नियोजित होती. ग्रंथालयातील पुस्तकांचे स्थलांतर घाईघाईने किंवा योग्य व्यवस्था न करता करू नये, अशी न्यायालयाची भूमिका आहे. त्यामुळे पुढील सुनावणीपर्यंत पुस्तकांचे स्थलांतर रोखण्याचे निर्देश देत, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडून या ऐतिहासिक ग्रंथालयाच्या जतनाबाबत स्पष्ट भूमिका अपेक्षित केली आहे.

बिल्कीस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणातील दोन आरोपींच्या जन्मठेपेला स्थगिती

महाईन्यूज । गुजरात

बिल्कीस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणातील दोन आरोपींच्या जन्मठेपेच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे आणि या दोन्ही आरोपींना जामीन मंजूर केला आहे. या आरोपींनी १७ वर्षांहून अधिक काळ तुरुंगात घालवला आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाकडून त्यांच्या पुढच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आली आहे आणि जामीन मंजूर केला आहे. या दोन्ही आरोपींच्या वकिलांनी हा दावा केला की दोन आरोपींपैकी एकजण हा दिव्यांग आहे. त्यामुळे त्याला दिलासा देण्यात आला आहे. जस्टिस एमएम सुंदरेश आणि जस्टिस प्रसन्ना बी वराले यांच्या पीठाने हा आदेश दिला आहे.





२८ ऑक्टोबरला बिल्कीस बानो प्रकरणातील दोन आरोपींच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आली आणि त्यांना जामीन मंजूर करण्यात आला. आपल्या आदेशात सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे की १७ वर्षांहून अधिक काळ दोन्ही आरोपींनी तुरुंगात घालवला आहे. त्यातला एक आरोपी दिव्यांग आहे. एका आरोपीच्या विरोधात FIR नाही. घटना घडल्यानंतर तीन वर्षांनी त्याला या प्रकरणात आरोपी करण्यात आलं. दरम्यान अतिरिक्त सॉलिसिटर जनरल राजा ठाकरे यांनी या जामीन मिळावा म्हणून करण्यात आलेल्या याचिकेचा कडाडून विरोध केला. कनिष्ठ न्यायालय आणि बॉम्बे हायकोर्टाने दोन्ही आरोपींविरोधात देण्यात आलेली साक्ष विचारांत घेऊनच त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. तसंच जो अपराध यांनी केला आहे त्याचं गांभीर्यही लक्षात घेतलं गेलं पाहिजे. मात्र सर्वोच्च न्यायालयाने या दोघांना जामीन मंजूर केला आहे.

२७ फेब्रुवारी २००२ या दिवशी गोध्रा या स्टेशनजवळ साबरमती एक्स्प्रेसचे काही डबे जाळण्यात आले. या घटनेत अयोध्येतून परतणाऱ्या ५९ कारसेवकांचा मृत्यू झाला. या घटनेचे पडसाद देशभरात उमटले आणि हिंसाचाराच्या घटना घडल्या. गुजरातमध्ये दंगल पेटली. याच दंगलीत बिल्किस बानोचं कुटुंबही सापडलं आणि होरपळून निघालं.


३ मार्च २००२ ला काय घडलं होतं?

बिल्किस बानो आणि तिचं कुटुंब जिथे लपलं होतं तिथे ३ मार्च २००२ या दिवशी २० ते ३० लोकांचा जमाव आला. त्यांच्या हातात तलवारी आणि काठ्या होत्या. त्यांनी या घरावर हल्ला केला. तसंच बिल्किस बानोवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. ही भयंकर घटना घडली तेव्हा बिल्किस बानो पाच महिन्यांची गर्भवती होती. तिच्या घरातल्या सात कुटुंबीयांची हत्या करण्यात आली. त्यावेळी तिच्या कुटुंबातले सहाजण पळून गेले होते. या प्रकरणात सीबीआय कोर्टाने ११ जणांना दोषी ठरवण्यात आलं. या सगळ्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. यातल्या एका आरोपीने गुजरात उच्च न्यायालयात एक अर्ज केला होता. त्यात त्याने रिमिशन पॉलिसीच्या अंतर्गत सुटकेची मागणी केली होती. गुजरात उच्च न्यायालयाने ती याचिका फेटाळली होती. बिल्किस बानोही या हल्ल्यात मारली गेली आहे असं मारेकऱ्यांना वाटलं. तसंच तिच्या कुटुंबावर या हल्ल्याचा इतका गहिरा परिणाम झाला की सहाजण बेपत्ता झाले. १७ पैकी सात जणांची हत्या झाली. एक कुटुंब या एका घटनेने उद्ध्वस्त झालं. बिल्किस बानो हल्ल्यानंतर आणि सामूहिक बलात्काराच्या घटनेनंतर तीन तास बेशुद्ध होती.

शर्वरीचा शाही अंदाज!




बॉलिवूड अभिनेत्री शर्वरी वाघ आपल्या अभिनयासोबतच हटके फॅशन आणि स्टायलिश लूकमुळेही नेहमी चर्चेत असते. वेस्टर्न असो किंवा पारंपरिक, प्रत्येक लूकमध्ये ती चाहत्यांचे लक्ष वेधून घेते. सध्या शर्वरी तिच्या आगामी 'ये प्रेम मोल लिया' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी तिने परिधान केलेल्या सुंदर पारंपरिक लूकने सोशल मीडियावर सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सोनेरी आणि पीच रंगाच्या शरारा सूटमध्ये शर्वरीचा शाही अंदाज पाहायला मिळत आहे. शर्वरीने तिच्या प्रमोशनल लूकसाठी सोनेरी आणि पीच रंगाची सुंदर रंगसंगती असलेला शरारा सूट निवडला आहे. या सूटवर आकर्षक एम्ब्रॉयडरी करण्यात आली असून, त्याला हॉल्टर-नेक डिझाइन देण्यात आले आहे. या डिझाइनमुळे तिच्या पारंपरिक लूकला आधुनिक टच मिळाला आहे. साधेपणा आणि आकर्षकपणा यांचा सुंदर मेळ तिच्या या पोशाखात पाहायला मिळतो. या शरारा सूटची खासियत म्हणजे त्यावरील नाजूक भरतकाम. सोनेरी रंगाची चमक आणि पीच रंगाची सुंदर छटा यामुळे संपूर्ण पोशाख अधिक आकर्षक दिसत आहे. चित्रपटाच्या प्रमोशनसाठी पारंपरिक लूक निवडताना शर्वरीने फॅशन आणि भारतीय संस्कृती यांचा उत्तम समतोल साधला आहे.



श्रद्धा कपूरचा स्टायलिश अंदाज चर्चेत!

बॉलिवूड अभिनेत्री श्रद्धा कपूर तिच्या अभिनयासोबतच साध्या आणि आकर्षक व्यक्तिमत्त्वासाठीही ओळखली जाते. तिच्या सहजसुंदर अंदाजाचे अनेक चाहते आहेत. श्रद्धा सोशल मीडियावर सक्रिय असून ती नेहमीच वेगवेगळ्या फोटो आणि व्हिडीओंच्या माध्यमातून चाहत्यांच्या संपर्कात असते. नुकतेच तिने काही नवीन फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये तिचे वेगवेगळे फॅशन लुक्स पाहायला मिळत आहेत. कधी कॅज्युअल स्ट्रीट स्टाइल, तर कधी ग्लॅमरस बॉस लेडी अंदाज अशा विविध लुक्समध्ये श्रद्धा लक्ष वेधून घेत आहे. विशेष म्हणजे, हातात गुलाब घेऊन दिलेल्या तिच्या पोझ चाहत्यांना चांगल्याच आवडल्या आहेत. पेस्टल पिंक ब्लेझर, फ्लोरल ड्रेस आणि बेज ट्रेंच कोट अशा वेगवेगळ्या आउटफिट्समध्ये श्रद्धाचा अंदाज पाहायला मिळत आहे. श्रद्धाच्या फोटोंमधील पहिला लुक नेव्ही ब्लू जॅकेटचा आहे. पांढऱ्या रंगाच्या टॉपवर तिने नेव्ही ब्लू जॅकेट परिधान केले आहे. या साध्या पण आकर्षक लुकला तिने गोल्डन चेन आणि हूप इअररिंग्सची जोड दिली आहे. मोकळे केस आणि साधा मेकअप यामुळे तिचा हा लुक अधिकच खुलून दिसत आहे.



अमिताभ बच्चन यांना जीवे मारण्याची धमकी

बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन आणि त्यांचे पुत्र अभिनेता अभिषेक बच्चन यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दोन्ही अभिनेत्यांना थेट जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याने मनोरंजन विश्वासह सुरक्षा यंत्रणांमध्येही खळबळ उडाली आहे. कुख्यात गँगस्टर गोल्डी ढिल्लों याच्या नावाने सोशल मीडियावर एक धमकीची पोस्ट आणि ऑडिओ शेअर करण्यात आला आहे. यामध्ये अमिताभ आणि अभिषेक बच्चन यांना लक्ष्य करण्याचा इशारा देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, दोघांनी कितीही बुलेटप्रूफ केबिन तयार केल्या किंवा सुरक्षेची व्यवस्था वाढवली, तरी त्यांना संपवू, अशा स्वरूपाची धमकी या पोस्टमध्ये देण्यात आली आहे. 'बुलेटप्रूफ केबिनमध्येही गोळ्या घालू', अशा धमकीच्या भाषेमुळे या प्रकरणाची गंभीरता वाढली आहे. विशेष म्हणजे, दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने नुकतेच दोन संशयित शूटर्सना अटक केली होती. त्यांच्याकडून मुंबईतील एका बॉलिवूड अभिनेत्यावर गोळीबार करण्याचा कथित कट उधळल्याची माहिती समोर आली होती. या कारवाईनंतरच गोल्डी ढिल्लोंच्या नावाने धमकीची पोस्ट समोर आली आहे. त्यामुळे बच्चन पिता-पुत्रांना असलेला संभाव्य धोका आणि या संपूर्ण प्रकरणामागील सूत्रधार कोण, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने विकास ठाकूर उर्फ विक्की आणि दीपक सिंह उर्फ दीप या दोन संशयित शूटर्सना अटक केली आहे. विकास ठाकूर याला दिल्लीतून, तर दीपक सिंह याला मुंबईतून ताब्यात घेण्यात आले. या दोघांचा संबंध परदेशात असलेल्या गुन्हेगारी टोळीच्या सूत्रधारांशी असल्याचा तपास यंत्रणांचा आरोप आहे. पोलिसांच्या तपासानुसार, या दोघांना दोन वेगवेगळ्या लक्ष्यांवर हल्ला करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. यातील एका प्रकरणात दिल्लीतील व्यावसायिकावर खंडणीसाठी गोळीबार करण्याचा कट होता, तर दुसऱ्या प्रकरणात १९८४ मधील शीखविरोधी दंगलींसंदर्भातील कथित वक्तव्यावरून मुंबईतील एका बॉलिवूड अभिनेत्याला लक्ष्य करण्याची योजना होती. पोलिसांनी कारवाई करत हा कथित कट उधळून लावला. मात्र, पोलिसांनी सुरुवातीला संबंधित अभिनेत्याचे नाव अधिकृतपणे जाहीर केले नव्हते.

रोहित-विराट पुन्हा निळ्या जर्सीत

संघाबाहेर फेकल्या गेलेल्या सूर्याचा BCCI ला करावा लागणार पुन्हा विचार

महाईन्यूज । मुंबई

भारतीय क्रिकेट संघाचा न्यूझीलंड दौरा अद्याप सुरूच आहे. या दौऱ्यातील एकदिवसीय मालिका नुकतीच संपन्न झाली असून, भारताने ती ३-१ अशी दिमाखात जिंकली आहे. आता भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिका खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. मात्र, कसोटी सामन्यांच्या थरारानंतर भारतीय संघाची पुढील एकदिवसीय मालिकाही फारशी दूर नाही. पुढील महिन्यात टीम इंडिया पुन्हा एकदा तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळणार आहे. ही मालिका कधी आणि कोणत्या संघाविरुद्ध होणार आहे, याबाबत क्रिकेट चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता आहे.



याबाबत क्रिकेट चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता आहे. या आगामी मालिकेत भारताचे दोन दिग्गज फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा पुन्हा एकदा निळ्या जर्सीत खेळताना दिसतील, अशी दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. पुढील महिन्यात, अर्थात डिसेंबरमध्ये श्रीलंकेचा संघ भारत दौऱ्यावर येणार आहे. या दौऱ्यात दोन्ही संघांमध्ये तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवली जाईल. या मालिकेतील पहिला सामना १३ डिसेंबर रोजी विशाखापट्टणम येथे होणार आहे. त्यानंतर दुसरा सामना १६ डिसेंबर रोजी बंगळुरू येथे खेळवला जाईल, तर मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना अहमदाबादच्या मैदानावर पार पडेल. या सामन्यासह या मालिकेची सांगता होईल. २०२६ या वर्षातील भारतीय संघाची ही शेवटची एकदिवसीय मालिका ठरणार आहे. त्यानंतर नवीन वर्षात म्हणजेच जानेवारी महिन्यात झिम्बाब्वेचा संघ भारत दौऱ्यावर येणार असून, दोन्ही देशांमध्ये ३ जानेवारीपासून एकदिवसीय मालिकेला प्रारंभ होईल.

सध्या सुरू असलेल्या न्यूझीलंड दौऱ्यातील एकदिवसीय मालिका संपल्याने रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा या दौऱ्यातील सहभाग संपुष्टात आला आहे. यापुढे न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या दोन सामन्यांच्या अत्यंत महत्त्वपूर्ण कसोटी मालिकेत हे दोन्ही दिग्गज खेळाडू खेळताना दिसणार नाहीत. या कसोटी मालिकेत युवा फलंदाज शुभमन गिल भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. दुसरीकडे, श्रीलंकेविरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघाची अधिकृत घोषणा अद्याप करण्यात आलेली नाही. मात्र, निवड समितीकडून जेव्हा संघ जाहीर केला जाईल, तेव्हा त्यामध्ये रोहित शर्मा आणि विराट कोहली या अनुभवी जोडीचा निश्चितपणे समावेश असेल, अशी अपेक्षा क्रीडा वर्तुळातून व्यक्त केली जात आहे. पुढील वर्षी दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया या तीन देशांच्या संयुक्त यजमानपदाखाली आयसीसी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा रंगणार आहे.

महास्पर्धेसाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू

विश्वचषकासाठी आता एका वर्षपेक्षाही कमी कालावधी शिल्लक राहिल्याने सर्वच संघ जास्तीत जास्त एकदिवसीय सामने खेळण्यावर भर देत आहेत. मायदेशात आणि परदेशात मालिका खेळून संघाची योग्य रचना आणि सर्वोत्तम समतोल साधण्याचा प्रयत्न संघ व्यवस्थापनाकडून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर आगामी मालिकांमध्ये विराट कोहली आणि रोहित शर्मा यांची कामगिरी कशी राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. हे दोन्ही दिग्गज खेळाडू आगामी विश्वचषकात खेळणार की नाही, हे अद्याप निश्चित झालेले नसले तरी, सध्याच्या मालिकांमधील खेळाडूंचा फॉर्म आणि कामगिरीच विश्वचषक संघातील त्यांचे स्थान निश्चित करणार आहे.

न्यूझीलंडमध्ये कशी आहे टीम इंडियाची कसोटी कामगिरी? कर्णधार गिलसमोर मोठे आव्हान

महाईन्यूज । नवी दिल्ली

टी-२० आणि एकदिवसीय मालिकांच्या यशस्वी समाप्तीनंतर आता भारत आणि न्यूझीलंड यांच्यात दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेचा थरार रंगणार आहे. दोन्ही संघांमधील या प्रतिष्ठेच्या कसोटी मालिकेला येत्या गुरुवारपासून (१९ नोव्हेंबर) सुरुवात होत असून, पहिला सामना वेलिंग्टन येथील प्रसिद्ध 'बेसिन रिझर्व्ह' मैदानावर खेळवला जाणार आहे. या दौऱ्यात आतापर्यंत भारतीय संघाने टी-२० आणि एकदिवसीय मालिका जिंकून आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. मात्र, कसोटी क्रिकेटमध्ये घरच्या मैदानावर भारताविरुद्ध असलेला आपला अलीकडचा दबदबा कायम राखण्यासाठी आणि विजयाची परंपरा पुढे नेण्यासाठी यजमान न्यूझीलंडचा संघ सर्वतोपरी प्रयत्न करेल.



आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (WTC २०२५-२७) गुणतालिकेत अव्वल स्थानावर विराजमान असलेला न्यूझीलंडचा संघ घरच्या मैदानावर आपली ही विजयी घोडदौड कायम ठेवण्यास उत्सुक आहे. टॉम लॅथमच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या किवी संघाने भारताविरुद्ध मायदेशात आणि परदेशात खेळलेल्या गेल्या तिन्ही कसोटी सामन्यांमध्ये शानदार विजय संपादन केले आहेत. त्यामुळे विजयाची हीच मालिका पुढे सुरू ठेवण्याच्या इराद्याने यजमान संघ मैदानात उतरेल. या मालिकेसाठी न्यूझीलंडने आपला पूर्ण ताकदीचा आणि अनुभवी संघ जाहीर केला आहे. याउलट, भारतीय संघात निवड झालेल्या १६ खेळाडूंपैकी केवळ तीनच खेळाडूंना न्यूझीलंडच्या खेळपट्ट्यांवर कसोटी सामने खेळण्याचा अनुभव आहे. त्यामुळे अनुभवाची ही कमतरता भरून काढत मजबूत किवी संघाशी दोन हात करणे, ही बाब कर्णधार शुभमन गिलसाठी अत्यंत चिंतेची आणि आव्हानात्मक ठरू शकते.

भारतीय संघाने १९६८ च्या सुरुवातीला पहिल्यांदाच न्यूझीलंडचा दौरा केला होता. तेव्हापासून आजतागायत भारताने न्यूझीलंडमध्ये एकूण १० कसोटी मालिका खेळल्या आहेत, परंतु त्यापैकी केवळ दोनच मालिका जिंकण्यात भारतीय संघाला यश आले आहे. नवाब मन्सूर अली खान पतौडी यांच्या नेतृत्वाखाली भारताने आपल्या पहिल्याच न्यूझीलंड दौऱ्यात चार सामन्यांची कसोटी मालिका ३-१ अशा फरकाने जिंकून ऐतिहासिक कामगिरी नोंदवली होती. यानंतर पुढील मालिका विजयासाठी भारताला तब्बल ४१ वर्षांची प्रदीर्घ प्रतीक्षा करावी लागली.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। मंगळवार ।
दि. 17 नोव्हेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE

Think | Thrive | Transform

APPROVED BY BAR COUNCIL OF INDIA

SCHOOL OF

LEGAL STUDIES

Learn Law. Lead Change.

BA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM

BBA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM



#2
(IIRF Rankings 2026)
Among New Age Private Universities- In Maharashtra

Moot Court & Practical Training

Legal Aid Support

ADMISSIONS OPEN 2026

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in

डॉ. आंबेडकरांचा नदीजोड प्रकल्प राबवा

नदीजोड प्रकल्पामुळे पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय;धरणांच्या निर्मितीवरही भर

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी नदीजोड प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या नदीजोड आणि जलव्यवस्थापनाच्या संकल्पनांचा गांभीर्याने विचार करून त्यानुसार प्रकल्प राबविण्यात यावेत. नद्यांचे अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागांकडे वळविल्यास पाणीटंचाईचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सोडविता येऊ शकतो, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.



राज्यातील विविध भागांमध्ये निर्माण होणारी पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आठवले यांनी नदीजोड प्रकल्पांची आवश्यकता अधोरेखित केली. विशेषतः मराठवाड्यासारख्या दुष्काळप्रवण भागांना पाण्याची उपलब्धता करून देण्यासाठी दीर्घकालीन नियोजन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर अवलंबून न राहता भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन कायमस्वरूपी जलव्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाच्या जलसंपत्तीचा विकास, सिंचन व्यवस्था आणि पाणी व्यवस्थापनाबाबत दूरदृष्टीपूर्ण विचार मांडले होते. त्यांच्या विचारांचा आधार घेऊन जलसंपत्तीचे नियोजन केल्यास दुष्काळी भागांना मोठा दिलासा मिळू शकतो. त्यामुळे नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य देण्याची आवश्यकता असल्याचे आठवले यांनी अधोरेखित केले.

दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीत वाढ करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर जनावरांच्या चाऱ्यासाठी उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या निधीतही वाढ व्हावी, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आठवले यांनी सांगितले. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान कमी करण्यासाठी शासनाच्या मदतीसोबतच दीर्घकालीन जलव्यवस्थापनाचे धोरण महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांबाबत (ईव्हीएम) विरोधी पक्षांकडून उपस्थित केल्या जाणाऱ्या शंकांवरही आठवले यांनी भाष्य केले. निवडणुकीत पराभव झाल्यानंतर काही राजकीय पक्ष ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित करतात; मात्र विजय मिळाल्यानंतर त्याच यंत्रणेबाबत आक्षेप घेत नाहीत, असे त्यांनी नमूद केले.

नदीजोड प्रकल्पातून दुष्काळावर उपाय

महाराष्ट्रातील अनेक भागांना दरवर्षी कमी पावसाचा आणि पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. काही भागांमध्ये अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होते, तर दुसरीकडे पावसाअभावी शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनतो. या परिस्थितीत पाण्याचे योग्य नियोजन आणि उपलब्ध जलस्रोतांचा समतोल वापर महत्त्वाचा ठरतो. एका भागात उपलब्ध असलेले अतिरिक्त पाणी गरज असलेल्या भागांपर्यंत पोहोचविण्यासाठी नदीजोड प्रकल्प प्रभावी ठरू शकतात.

कृषी आणि पर्यावरण संशोधनाची आवश्यकता

दुष्काळावर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी कृषी आणि पर्यावरण क्षेत्रातील संशोधकांनीही पुढाकार घ्यावा, असे आवाहन आठवले यांनी केले. बदलते हवामान, पावसाचे अनिश्चित प्रमाण, भूजल पातळीत होणारी घट आणि शेतीसमोरील आव्हाने यांचा अभ्यास करून प्रभावी उपाययोजना सुचविणे आवश्यक आहे. संशोधनाच्या माध्यमातून पाण्याचा काटकसरीने वापर, जलसंधारण आणि शेतीच्या पद्धतींमध्ये आवश्यक बदल याबाबत मार्गदर्शन मिळू शकते. दुष्काळी परिस्थितीचा सर्वाधिक परिणाम शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होत असतो. पाण्याअभावी पिकांचे नुकसान होते, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होतो आणि शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो.

किल्ल्यांच्या माध्यमातून चिमुकल्यांनी जागविला स्वराज्याचा इतिहास!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, स्वराज्याचा गौरवशाली इतिहास आणि गड-किल्ल्यांची परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'किल्ले बनवा' स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला. रविवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी सकाळी पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाउंडेशनच्या प्रांगणात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धेत बालचिमुकल्यांनी साकारलेल्या विविध गड-किल्ल्यांच्या प्रतिकृतींमधून त्यांची कल्पकता, कलात्मकता आणि इतिहासाविषयीची आवड पाहायला मिळाली.



या स्पर्धेत युवराज राऊत आणि गोपाल प्रतिष्ठान यांनी प्रथम क्रमांक पटकावला. स्वराज प्रतिष्ठान यांनी द्वितीय, तर आरती पुजारी यांनी तृतीय क्रमांक मिळविला. तसेच श्रीयांश कुंजीर, आदित्य रोडे आणि आम्ही शिवबाचे मावळे यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याशिवाय स्पर्धेत सहभागी झालेल्या जवळपास २५ स्पर्धकांना उत्तेजनार्थ बक्षिसे देऊन त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यात आले.

या बक्षीस वितरण समारंभास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे, नगरसेविका अनिता काटे, केशव शंखनाद पथकाच्या प्रणिता अवधूत, सामाजिक कार्यकर्त्या शारदा मुंडे, लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष अशोक वारकर, आनंद हास्य योगा क्लबचे अध्यक्ष दिगंबर राजगुरे, अनिल कुलकर्णी, रमेश वाणी, राजू शेलार आणि उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

महापालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांची मनमानी सुट्टी

बंद असलेल्या पोलिस ठाण्याची अज्ञात व्यक्तीकडून तोडफोड, पुन्हा कार्यान्वित करण्याची तयारी

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कामकाजाबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दिवाळीनिमित्त महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सलग पाच दिवसांची सुट्टी देण्यात आली होती. मात्र, ही अधिकृत सुट्टी संपल्यानंतरही काही अधिकारी आणि कर्मचारी अतिरिक्त दोन दिवस मनमानी पद्धतीने गैरहजर राहिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या गैरहजर कर्मचाऱ्यांमुळे महापालिकेच्या विविध कार्यालयांमध्ये कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला.



या प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करावी आणि दोषींवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश वाघेरे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दिवाळी हा सर्वांचाच आनंदाचा आणि उत्साहाचा सण असल्याने शासकीय कार्यालयांमध्येही नियमानुसार सुट्ट्या जाहीर केल्या जातात. त्यानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सलग पाच दिवसांची दिवाळी सुट्टी देण्यात आली होती. ही सुट्टी संपल्यानंतर गुरुवार, दि. १२ नोव्हेंबर आणि शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर २०२६ रोजी महापालिकेचे नियमित कामकाज पूर्ववत होणे अपेक्षित होते. मात्र, या दोन्ही दिवशी अनेक अधिकारी आणि कर्मचारी कार्यालयात उपस्थित नसल्याचे चित्र दिसून आल्याचा दावा रमेश वाघेरे यांनी केला आहे. त्यामुळे अधिकृत सुट्ट्या संपल्यानंतरही काही कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या सोयीनुसार अतिरिक्त सुट्ट्या घेतल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

मात्र, कार्यालयात पोहोचल्यानंतर संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नसल्यास नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जातात. संबंधित काम पूर्ण न झाल्याने त्यांना पुन्हा कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. दिवाळीच्या सुट्टीनंतरही दोन दिवस अनेक अधिकारी-कर्मचारी गैरहजर असल्यामुळे अशाच प्रकारची परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप वाघेरे यांनी केला आहे. महापालिकेच्या विविध विभागांमधील कामकाजावरही याचा परिणाम झाल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना लाखोंच्या घरात वेतन मिळते. त्याचबरोबर सणासुदीच्या काळात लाखोंच्या घरात बोनसही दिला जातो. नागरिकांनी भरलेल्या करातून महापालिकेचा संपूर्ण प्रशासकीय कारभार चालतो. त्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या पदाची जबाबदारी ओळखून नागरिकांच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य देणे अपेक्षित आहे.

कार्यालयांमध्ये नागरिकांची गैरसोय

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसह विविध प्रभाग कार्यालये आणि करसंकलन कार्यालयांमध्ये नागरिक आपल्या दैनंदिन कामांसाठी येत असतात. मालमत्ता कर, विविध दाखले, बांधकामविषयक कामे, नागरी सुविधा, प्रशासकीय परवानग्या तसेच अन्य महत्त्वाच्या कामांसाठी नागरिकांना संबंधित विभागांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते. अनेकदा नागरिक आपली वैयक्तिक कामे बाजूला ठेवून महापालिकेच्या कार्यालयात येतात. काही नागरिकांना कामासाठी सुट्टी घ्यावी लागते, तर काहींना लांबचा प्रवास करून कार्यालय गाठावे लागते.

मावळच्या अभिमन्यू शिंदेंची शासनाच्या ६३ सदस्यांच्या यादीत निवड

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या मराठा आरक्षण कक्षामार्फत राज्यातील विविध शासकीय कार्यालयांमधील जुन्या अभिलेखांची तपासणी करून कुणबी नोंदी शोधण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या राज्यस्तरीय मोहिमेसाठी मावळ तालुक्यातील कामशेत येथील अभिमन्यू प्रकाश शिंदे यांची मोडी लिपी वाचक म्हणून निवड करण्यात आली आहे.



महाराष्ट्र शासनाच्या १५ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या पत्रानुसार राज्यातील विविध शासकीय कार्यालयांमधील जुन्या अभिलेखांची तपासणी करण्यासाठी अभ्यासक प्रतिनिधी, मोडी लिपी वाचक आणि वंशावळ जुळविणारे तज्ज्ञ यांचे सहकार्य घेतले जाणार आहे. यासाठी निश्चित करण्यात आलेल्या ६३ प्रतिनिधींच्या यादीत अभिमन्यू शिंदे यांचा समावेश करण्यात आला आहे.

शिंदे यांनी यापूर्वी पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्यावतीने आयोजित मोडी लिपी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. १० ते १९ सप्टेंबर २०२५ या कालावधीत मुंबई येथे झालेल्या प्रशिक्षणात त्यांनी सहभाग घेतला होता. प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल त्यांना शासनाचे प्रमाणपत्रही प्रदान करण्यात आले आहे.

१२ ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या विशेष मोहिमेत जुन्या मोडी लिपीतील दस्तऐवजांचे वाचन, महसुली अभिलेखांची तपासणी, कुणबी नोंदींचा शोध आणि वंशावळ जुळविण्याच्या प्रक्रियेला विशेष महत्त्व असणार आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील शासकीय कार्यालये तसेच मुंबई येथील फोर्ट परिसरातील पुराभिलेख संचालनालयात ही मोहीम राबविण्याचे नियोजन आहे.

मावळ तालुक्यातील जुन्या महसुली नोंदी आणि ऐतिहासिक दस्तऐवजांमध्ये महत्त्वपूर्ण माहिती दडलेली असण्याची शक्यता आहे. या नोंदींचे अचूक वाचन, पडताळणी आणि त्यातून कुणबी नोंदींचा शोध घेण्यामध्ये मोडी लिपी वाचकांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

> मावळ तालुक्यासाठी मोडी लिपी वाचक म्हणून मिळालेली जबाबदारी मी अत्यंत गांभीर्याने स्वीकारली आहे. कुणबी नोंदी शोधण्याची ही मोहीम अनेक कुटुंबांच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. जुन्या अभिलेखांमधील नोंदींचे अचूक वाचन करून उपलब्ध माहिती समोर आणण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे. कोणतीही पात्र नोंद दुर्लक्षित राहू नये, यासाठी शासनाच्या नियमांचे पालन करून संबंधित विभागांशी समन्वय साधणार आहे.
>
> - अभिमन्यू शिंदे

Express
Media Enterprises

Professional Live set up with live drone available..

- Documentary
- Weddings
- Drone
- Motion Graphics
- Testimonials
- Tutorial videos
- Product Videos
- Animation
- Social Media Content
- Promotional Videos
- Real Estate
- Corporate
- Advertising
- Events



PUNE

Contact: 9657767000/9370493922/9664188046